निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

अंक – २०९ वा
शनिवार दि.०४ ऑक्टोबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd. No. ABD-[illegible] | RNI.No.MAH/MAR2011/39247

## उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांच्या बॉडीचा दोन दिवस छळ केला


### रामदास कदम यांचा आरोप; हातांचे ठसे घेतले, नार्को टेस्टची केली मागणी

**आत्ताच एक्सप्रेस प्रतिनिधी**

**मुंबई–** उद्धव ठाकरे यांनी आपले वडील तथा दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या मृतदेहाचा सलग २ दिवस छळ केल्याचा गंभीर आरोप उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी केला आहे. उद्धव ठाकरे दिसतात तसे नाहीत. ते कपटी आहेत. त्यांनी शिवसेनाप्रमुखांच्या बॉडीचा सलग २ दिवस छळ केला. मी खोटे बोलत असेल तर माझी व उद्धव ठाकरे यांची नार्को टेस्ट करा. होऊन जाऊ द्या दूध का दूध आणि पाणी का पाणी, असे ते म्हणालेत. रामदास कदम यांच्या या आरोपांमुळे दोन्ही शिवसेनेतील राजकारण चांगलेच तापले आहे.

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा काल दसरा मेळावा झाला. या मेळाव्यात भाषण करताना रामदास कदम यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर बाळासाहेबांच्या मृतदेहाचा छळ केल्याचा आरोप केला होता. या मुद्यावरून शिंदे व ठाकरे गटाच्या नेत्यांत आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. या पार्श्वभूमीवर कदम यांनी आज पुन्हा पत्रकारांशी संवाद साधताना आपण आपल्या विधानावर ठाम असल्याचे ठणकावून सांगितले.

रामदास कदम म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या बॉडीचा सलग २ दिवस छळ केला. माझ्यासारखा ५० वर्षे मातोश्रीत वाढलेला माणूस असे का बोलते याचे उद्धव यांनी



आत्मपरीक्षण करावे. हिंमत असेल तर त्यांनी स्वतः पुढे येऊन बोलावे. मी अंबादास दानवेंसारख्यांना उत्तर देणार नाही. या दानवेंना मी स्वतः निवडून आणले. माझ्यामुळे ते आमदार झाले. ते एहसान फरामोश आहेत. ते मला बाळासाहेब व शिवसेना काय शिकवणार? बाळासाहेब ठाकरे माझे दैवत आहेत. मी आजही पूजेला बसताना त्यांच्या फोटोपुढे डोके टेकवतो. पण रामदास कदम सारख्या ज्येष्ठ नेत्याला हे का बोलावे लागते?

उद्धव ठाकरे यांना दुसऱ्यांच्या खांद्यावर बंदुक ठेवून चाप ओढण्याची सवय आहे. ते दिसतात तसे नाहीत. ते कपटी आहेत. त्यांनी सलग २ दिवस शिवसेनाप्रमुखांच्या बॉडीचा छळ केला. हे मी फार जबाबदारीने सांगत आहे. मी खोटे बोलत असेल तर माझी व उद्धव ठाकरे यांची नार्को टेस्ट करा. होऊन जाऊ द्या दूध का दूध पाणी का पाणी, असेही ते यावेळी म्हणाले.

रामदास कदम पुढे म्हणाले, मी आतापर्यंत केव्हाच खोटे बोललो नाही. मी उद्धव ठाकरेंना सांगितले होते की, बाळासाहेब आमचे दैवत आहेत. त्यांच्या पायांचे ठसे घेऊन ठेवा. त्यावर त्यांनी मला त्यांच्या हातांचे ठसे घेऊन ठेवल्याचे सांगितले होते. हे आमच्या (पान ४ वर)

### रामदास कदमांच्या आरोपांना आज अनिल परब उत्तर देणार

शिंदेंच्या शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केलेल्या आरोपांवर आता ठाकरेंचे अनिल परब उत्तर देणार आहेत. अनिल परब शनिवारी पत्रकार परिषद घेऊन सर्व आरोपांना उत्तर देणार आहेत. तसेच बाळासाहेबांच्या मृत्यूपत्रासंबंधीही अनिल परब मोठा खुलासा करणार आहेत. बाळासाहेब ठाकरे यांचा मृत्यू झाल्यानंतरही दोन दिवस त्यांचा मृतदेह ठेवण्यात आला, उद्धव ठाकरेंनी त्यांच्या हाताचे ठसे घेतल्याचा आरोप रामदास कदम यांनी केला होता.

रामदास कदम यांनी या आधीही उद्धव ठाकरे यांच्यावर अनेक आरोप केले. शिंदेंच्या दसरा मेळाव्यातही त्यांनी बाळासाहेबांच्या मृत्यूसंदर्भात उद्धव ठाकरे यांच्यावर मोठा आरोप केला होता. त्याला आता ठाकरेंच्या शिवसेनेकडून उत्तर देण्यात येणार आहे. अनिल परब आता रामदास कदम यांना नेमकं काय उत्तर देणार, कदमांचे आरोप कसे खोडून काढणार आणि बाळासाहेब ठाकरेंच्या मृत्यूपत्रावर नेमका काय खुलासा करणार याकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर

**आत्ताच एक्सप्रेस प्रतिनिधी**

**मुंबई –** राज्यातील जिल्हा परिषदांच्या अध्यक्ष पदाची आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता नगरपरिषदांच्या नगराध्यक्ष पदांचे आरक्षण येत्या सोमवारी जाहीर होणार आहे. नगराध्यक्षपद आरक्षणाची सोडत सोमवारी मंत्रालयात काढली जाणार आहे. मान्यताप्राप्त राष्ट्रीय आणि राज्य पक्षांच्या प्रतिनिधींना सोडतीवेळी हजर राहण्यासाठी पत्र देण्यात आली आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर घेण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. प्रशासकीय पातळीवर निवडणूक पूर्व प्रक्रिया पूर्ण केल्या जात आहेत.

गुरुवारी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी आरक्षण जाहीर होण्याची तारीख निश्चित झाली आहे. यानुसार १३ ऑक्टोबरला आरक्षण सोडत असणार आहे. राज्यातील ३२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या ३३६ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्यपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी १३ ऑक्टोबर २०२५ रोजी आरक्षण सोडत काढण्यात येणार असल्याची घोषणा राज्य निवडणूक आयोगाने (एू तमूदह ण्दस्स्ग्दह) केली आहे. त्याचबरोबर नगरपरिषद, नगरपंचायतींची प्रारुप मतदार यादी ८ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार आहे. संबंधित जिल्हाधिकारी १० ऑक्टोबर २०२५ रोजी वृत्तपत्रांत आरक्षण सोडतीसंदर्भातील सूचना प्रसिद्ध करतील. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सोडत काढल्यानंतर प्रारूप आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. त्यावर १४ ते १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून ३ नोव्हेंबर २०२५ रोजी शासन राजपत्रात अंतिम आरक्षण प्रसिद्ध केले जाणार आहेत.

## मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचे काम सुरु झाले नाही तर दिवाळीनंतर सरकारला अवघड होईल–मनोज जरांगे

**आत्ताच एक्सप्रेस प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर –** जर मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचे काम सुरू झाले नाही, मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेतले गेले नाही तर दिवाळीनंतर सरकारला खूप अवघड जाईल, असा इशारा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. तर राज्यात मराठा–ओबीसी वाद नाही. मराठा आणि ओबीसी बांधवांकडून मोठी चूक झाली, सगळ्यांनी एकमेकांना डायरेक्ट बोलले. छगन भुजबळ बोलले म्हणजे संपूर्ण माळी समाज बोलला असे होत नाही. हे केवळ लाभार्थी टोळी असते. जसे बीडचा हॉटेलवाला त्याने स्वत:च हॉटेल जाळले आणि विमा देखील उचलला.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, धनगर समाजाचा नेता आमच्याविरोधात बोलला तिथे समाजाचा काय संबंध आला. त्यांची लाभार्थी टोळी आणि तोच केवळ विरोधात बोलत असतात हे सत्य आहे. सर्वसामान्य ओबीसी बांधवांना मराठा समाजाला आरक्षण मिळावे असे वाटते. पण काही नेते बोलतात आणि आपण त्यांना ओबीसी समाज म्हणतो हे चुकीचे आहे. त्यामध्ये साडेतीनशे जातींचा काय संबंध. मराठ्यांनी ओबीसींना दोष देऊ नये. कोणत्याही जातीचा यात काही संबंध नाही केवळ नेते विरोधात बोलतात, आता जातीच्या विरोधात बोलायचे नाही, केवळ नेत्याना लक्ष करणार.

बीडमधील महादेव मुंडे खून प्रकरण, संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपी आणि काही जणांवरील मकोका उठवण्यात आले त्याबद्दल मी ८ दिवसांपूर्वी सरकारशी चर्चा केली आहे. कारण यावर आता पुन्हा एकदा मोठे आंदोलन होणार आहे. संतोष देशमुख, महादेव मुंडे प्रकरणी फक्त दिखावू पणा केला का? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. यापुढे आता खूप काही निघणार आहे. हे मराठा आरक्षणाच्या विरोधात गेले ना आता यांच्या बऱ्याच गोष्टी बाहेर निघणार आहेत.

मराठा आरक्षणाच्या जी आरला जर चॅलेंज करायचे ठरवले तर आपण सर्वांनी तहसीलदार आणि जिल्हाधिकारी यांना निवेदन द्यायला सुरू करा आणि १९९४ चा जी आर रद्द करायचा म्हणून मी सुद्धा पत्र लिहिणार आहे. ५० टक्क्याच्या वर गेलेले आरक्षण रद्द करावे अशी मागणी सरकारला करणार आहे. १९६७ नंतर ज्या १८० जातींना आरक्षणाचा लाभ मिळाला आहे, मंडल कमिशनने दिलेले १४ टक्के आरक्षणानंतर यामध्ये पावणे दोनशे जाती आरक्षणात गेल्या ते सर्व आरक्षण रद्द करावे. काही जातींनी आम्ही समान आहेत म्हणून आरक्षण घेतले आहे, त्यांचेही आरक्षण रद्द करण्यात (पान ४ वर)

## जरांगेंनी पाचवीला ॲडमिशन घ्यावे लक्ष्मण हाकेंचा जोरदार हल्लाबोल

**आत्ताच एक्सप्रेस प्रतिनिधी**

**बीड –** राज्यात सध्या मराठा आरक्षणासह ओबीसी आरक्षणाच्या विषयावरून वातावरण तापल्याचं चित्र आहे. पुन्हा एकदा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्यामध्ये पुन्हा एकदा एकमेकांवर हल्लाबोल केल्याचं दिसून आलं आहे. मनोज जरांगे यांनी लक्ष्मण हाके यांच्याबाबतच्या प्रश्नावर अश्लील हातवारे केल्याचं दिसून आलं, याबाबत बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, त्यातून त्यांची संस्कृती दिसून आली आहे. जरांगे यांना पाचवीत नेऊन टाका म्हणजे त्यांना नागरिकशास्त्र कळेल आणि बाकी सगळं त्यांना लगेच लक्षात येईल. ही सार्वजनिक ठिकाणी बोलण्याची भाषा आहे का? विचाराचं उत्तर कधीतरी उत्तराने द्यावं असंही हाकेंनी म्हटलं आहे.

एक दिवस मनोज जरांगेंसमोर बूम नसला तर त्याच्या जिवाचा तिळपापड होतो.ते माझ्याबाबत बोलताना टीका करताना म्हणातात, कधी मी येवल्याचा माणूस आहे. कधी फडणवीस यांचा माणूस आहे, असं जरांगे म्हणतात, यांच्या डोक्याची मंडई झाली आहे, मनोज जरांगे हरामखोर माणूस आहे. महाराष्ट्रातलं वातावरण जरांगे यांनी बिघडवले. मराठ्यांना मनोज जरांगे सारखा नेता मिळाला हे मराठ्यांचे दुर्दैव आहे. मनोज जरांगेंची भाषा लोकशाहीची नाही. कधीतरी त्यांनी विचाराचं उत्तर विचारांनी द्यावं. मराठा समाज सामाजिक दृष्ट्या मागास नाही. हे फक्त आम्ही म्हणत नाही तर हे आयोग म्हणत आहे, सुप्रिम कोर्ट म्हणत आहे, अनेक आयोग म्हणत आहेत, याचं उत्तर जरांगेंकडे नाही, असंही पुढे लक्ष्मण हाकेंनी म्हटलं आहे.

## मुंबई मराठी माणसांपासून तोडण्यासाठी एकनाथ शिंदेंनी कुऱ्हाड दिली; संजय राऊतांचा घणाघात

**आत्ताच एक्सप्रेस प्रतिनिधी**

**मुंबई –** एकनाथ शिंदेंनी आत्मचिंतन करावे आणि आज मी या पदावर कुणामुळं आहे, यापूर्वी मी काय होतो याचा विचार करायला हवा. उद्धव ठाकरेंमध्ये दानत होती म्हणून रिक्षावाले आमदार आणि मंत्री झाले. त्यामुळे कधीही प्रॅक्टिस न केलेला मुलगा खासदार झाला. हार्ड वैद्यांचे प्रमाणपत्र बघा मोदीही मागे पडतील, हे सर्व उद्धव ठाकरेंच्या दानतीमुळे शक्य झाले,असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. शिंदे गटाचे लोक अमित शहा



यांच्या पादुकाचे पूजन करतात म्हणून त्यांच्या मेंदूवर परिणाम झाला आहे.

उबाठाचे नेते संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदे, रामदास कदम यांना काही बाळासाहेब ठाकरेंनी नेता केले नाही. त्यांना (पान ४ वर)

## संघाला १०० वर्षात स्वत:चे नेतृत्व निर्माण करता आले नाही!–भास्कर जाधव

**आत्ताच एक्सप्रेस प्रतिनिधी**

**मुंबई –** रा.स्व.संघाला काल १०० वर्षे पूर्ण झाली म्हणून एक कार्यक्रम घेण्यात आला. माझा त्यांना एक प्रश्न आहे की, रा.स्व.संघाच्या विचारांचे प्रत्येक जण कौतुक करतो आणि आम्ही रा.स्व.संघाचे विचारांमध्ये वाढले म्हणून सांगातो, संघाचे विचार आत्मसात केले असे सांगतात १०० वर्षांमध्ये संघाला १०० नव्हे ५० ही नेतृत्व तयार करता आले नाहीत, हे त्यांचे अपयश आहे, असे उबाठा गटाचे नेते भास्कर जाधव यांनी म्हटले आहे.

आमदार भास्कर जाधव म्हणाले की, संघाला नेतृत्व तयार करता न आल्याने दुसऱ्या पक्षातील तयार झालेली नेतृत्व चोरायची आपल्या पक्षात घेऊन जाण्यासाठी त्यांना धाक दाखवायचा त्यांच्या पाठीमागे खोट्या चौकशांचा ससेमिरा लावायचा आणि त्यांना आपल्या पक्षात घेऊन जात पावन करुण घ्यायचे. महाराष्ट्रातील मंत्रिमंडळातील कोणत्याही नेत्यांचे नाव घ्या जो भाजप, संघ, विश्व हिंदू परिषद यांच्या विचाराने प्रेरित होऊन गेला का? सर्व जण कुठल्या ना कुठल्या चौकशी आणि जेलच्या भीतीने गेले आहेत. हा संघाचा १०० वर्ष केलेल्या कामाचा पराभव आहे.

आमदार भास्कर जाधव म्हणाले की, आजपर्यंत जे जे लोकं या पक्षातून त्या पक्षात गेले त्या सर्व व्यक्तीवर कोणत्या ना कोणत्या प्रकारची कारवाई सुरू आहे. त्यांच्यावर कोणती ना कोणती चौकशी सुरू आहे. भाजपचे मोठे वॉशिंग मशीन आहे, एकनाथ शिंदे त्यांच्या बाजूला गेल्याने त्यांनी अमित शहा यांच्या अनेकदा भेटी घेऊन छोटे वॉशिंग मशीन आणलेले असावे म्हणून त्या वॉशिंग मशिनमध्ये जाऊन हे सगळे स्वत: स्वच्छ करुण घेत आहेत. पण या सर्वांची कुठूनही सुटका नाही. चिपळूणमध्ये काल एकाचा पक्षप्रवेश झाला कारण त्यांच्या सोसायटीची चौकशी लागलेली. चौकशा लावायच्या आणि आपल्या पक्षात घ्यायचे हे काम महायुतीचे सुरू आहे, असा टोला भास्कर जाधव यांनी लगावला आहे.

## उच्च न्यायालयाच्या लढाईत नितीन गडकरींच्या विरोधात अंजली दमानियांना अपयश

**आत्ताच एक्सप्रेस प्रतिनिधी**

**मुंबई –** एक सत्याचा लढा आज हरले. नितीन गडकरी आणि अतुल शिरोडकर जिंकले. फक्त ढसा ढसा रडावेसे वाटत आहे, असे ट्विट सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केले आहे. आज झालेल्या उच्च न्यायालयाच्या सुनावणीत अंजली दमानिया यांना अंतरिम दिलासा मिळाला नसल्याने त्यांनी या भावना सोशल मीडियावर व्यक्त केल्या आहेत.

अंजली दमानिया म्हणाल्या, आज हाय कोर्टात सुनावणी झाली. कोर्टाने अंतरिम दिलासा दिला नाही. म्हणजे आज या सगळ्या लोकांची घरे, जी त्यांनी कष्टाच्या पैशांनी विकत घेतली होती, ती एक असा माणूस तोडणार जो फक्त गडकारींचा बिझनेस पार्टनर आहे, म्हणून जिंकला. खरेच या लढ्याला उपयोग आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच फक्त ढसा ढसा राडावेसे वाटत असल्याचे देखील त्यांनी भावना व्यक्त केल्या. पुढे त्यांनी लिहिले की, गडकरी तुमच्या कर्माची फळे तुम्हाला याच जन्मात भोगावी लागतील, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

## लहान मुलांसाठी कफ सिरपच्या वापरासंबंधी केंद्र सरकारची नवी मार्गदर्शक तत्त्वे जारी

**आत्ताच एक्सप्रेस प्रतिनिधी**

लहान मुलांच्या आरोग्य सुरक्षिततेसाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी कफ सिरप आणि सर्दीवरील औषधांच्या वापराबाबत महत्त्वपूर्ण नवी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या सूचनांनुसार, बालरोग तज्ज्ञ आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना लहान मुलांना ही औषधे देताना विशेष काळजी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, दोन वर्षांखालील मुलांना कफ आणि सर्दीवरील कोणतीही औषधे देऊ नयेत. तसेच, पाच वर्षांखालील मुलांसाठी ही औषधे सामान्यतः शिफारस केलेली नाहीत. कारण, लहान मुलांमधील तीव्र कफ आणि सर्दीचे बहुतांश आजार स्वतःहून बरे होतात आणि त्यासाठी औषधांची गरज पडत नाही.

कफ आणि सर्दीवर प्राथमिक उपचार म्हणून नैसर्गिक उपायांना प्राधान्य देण्याचा सल्ला देण्यात आला आहे. यामध्ये पुरेसे पाणी पिणे, विश्रांती घेणे आणि आधार देणारे उपाय यांचा समावेश आहे. औषधोपचार आवश्यक असल्यास, डॉक्टरांनी रुग्णाची काळजीपूर्वक तपासणी करून आणि जवळच्या देखरेखीखाली औषधे द्यावीत. डॉक्टरांनी सांगितलेल्या डोस आणि उपचाराच्या कालावधीचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे. एकाच वेळी अनेक औषधे मिसळून देणे टाळावे, असेही निर्देश आहेत.

सर्व आरोग्य केंद्रे आणि दवाखान्यांनी केवळ उत्तम उत्पादन मानकांनुसार तयार केलेली आणि उच्च औषधी दर्जाची कफ सिरप खरेदी करावीत, असे मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद आहे. यामुळे औषधांची सुरक्षितता आणि परिणामकारकता (पान ४ वर)

## सोनम वांगचुक यांच्या पत्नीची सर्वोच्च न्यायालयात धाव

**आत्ताच एक्सप्रेस प्रतिनिधी**

**नवी दिल्ली –** सामाजिक, पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या अटकेविरोधात त्यांची पत्नी गीतांजली अंगमो यांनी शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात हॅबिअस कॉर्पस याचिका दाखल केली. त्यावर सोमवारी ६ ऑक्टोबर रोजी सुनावणी होण्याची शक्यता आहे. लडाख पोलिसांनी आठ दिवसांपूर्वी सोनम यांना राष्ट्रीय सुरक्षा कायदाअंतर्गत अटक केली होती.

लडाखमधील हिंसाचाराला जबाबदार धरून सोनम वांगचूक यांना अटक केल्याचा आरोप केला जात आहे. हा आरोप केंद्र सरकारने फेटाळला असला तरी त्यांना आठवड्याभरानंतरही सोडण्यात आलेले नाही. त्यांना राजस्थानातील जोधपूरमधील तुरुंगात ठेवण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यांच्या सुटकेसाठी गीतांजली यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहिले, मात्र त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे, अखेर सोनम यांच्या सुटकेसाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घ्यावी लागल्याचे गीतांजली अंगमो यांचे म्हणणे आहे.

सोनम यांच्या अटकेला एक आठवडा उलटल्यानंतरही त्यांची प्रकृती (पान ४ वर)

## आजपासून महाराष्ट्रात इलेक्ट्रॉनिक बॉण्डची सुरुवात

**आत्ताच एक्सप्रेस प्रतिनिधी**

**मुंबई –** आता कागदी बॉण्डची झंझट संपणार आहे. कारण आजपासून महाराष्ट्रात इलेक्ट्रॉनिक बॉण्डची सुरुवात करण्यात येणार आहे. इलेक्ट्रॉनिक बॉण्डमुळे आयातदार व निर्यातदारांना मोठा दिलासा मिळणार आहे. कस्टम अधिकाऱ्यांकडून तत्काळ पडताळणीमुळे फसवणुकीसही आता आळा बसणार आहे. आधीच्या बॉण्डमध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने बदल किंवा रक्कम वाढ करणे शक्य होईल. कस्टम अधिकारी व ग्राहकांच्या ई–स्वाक्षरीमुळे व्यवहार अधिक सुरक्षित व पारदर्शक होणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी इलेक्ट्रॉनिक बॉण्डबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

## नकाशावर दिसायचे असेल तर दहशतवाद्यांना मदत करणे थांबवा

### लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांचा पाकिस्तानला कठोर इशारा

**आत्ताच एक्सप्रेस प्रतिनिधी**

**नवी दिल्ली –** ऑपरेशन सिंदूरनंतर, भारताची पाकिस्तानविरुद्धची भूमिका आणखी कठोर झाली आहे. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी शुक्रवारी गंगानगरमधील घडसाणातील गावांना भेट दिली आणि येथून पाकिस्तानला इशारा दिला. ते म्हणाले की, जर पाकिस्तानला नकाशावर दिसायचे असेल तर दहशतवाद्यांना मदत करणे थांबवावे लागेल. भारतीय लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांनी पाकिस्तानला कठोर इशारा देत म्हटले आहे की, जर त्यांनी दहशतवादाला पाठिंबा देणे थांबवले नाही तर ते नकाशावरून पुसले जाऊ शकतात. इतकेच नाही तर ते म्हणाले की यावेळी भारतीय लष्कर पाकिस्तानविरुद्ध कोणताही संयमाची भूमिका घेणार नाही. जर पाकिस्तानने दहशतवाद थांबवला नाही तर भारत ऑपरेशन सिंदूरचा दुसरा टप्पा सुरू करेल असे भारतीय लष्कर प्रमुख उपेंद्र द्विवेदी यांनी सांगितले. ते म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर १.० दरम्यान भारतीय लष्कराने पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले होते. या कारवाईत पाकिस्तानी सैनिक आणि अनेक दहशतवादी मारले गेले होते. त्यांनी पुढे सांगितले की, ऑपरेशन सिंदूरच्या यशाचे श्रेय लष्कराचे जवान आणि स्थानिक लोकांना जाते.

## संपादकीय

# माणूस आणि यंत्र

यंत्रांवर सैनिकाची भिस्त असतेच, त्यामुळेच या यंत्रांशी त्यांचे भावनिक नाते दृढ होत जाते. मिग २१च्या निमित्ताने त्याचे स्मरण झाले. भारतीय हवाई दलात सहा दशके सेवा बजावलेली मिग २१ ही बहुचर्चित विमाने दोन दिवसांपूर्वी चंडीगड हवाई दल तळावर समारंभपूर्वक निवृत्त झाली. विमानांनी हवेत तिरंगी धूम्ररेषा उमटविल्या. विमानांचे संचलन पाहण्यास संरक्षणमंत्री राजनाथसिंह उपस्थित होते. हवाईदल प्रमुख एअरचीफमार्शल अमरप्रीतसिंग हे 'मिग २१'च्या अखेरच्या उड्डाणात वैमानिक म्हणून सहभागी झाले होते. ज्या उडत्या यंत्राच्या अंगाखांद्यावर आपण खेळलो, वाढलो त्या यंत्राला हवाईदल प्रमुख या नात्याने निरोप देताना वायुवीराच्या मनात हळवे भाव दाटून येणे स्वाभाविकच. यानिमित्ताने विविध वायुवीर, नौदल अधिकारी, सैनिक यांचे त्यांनी सेवा बजावलेल्या युद्धनौका, उडविलेली विमाने, नेतृत्व केलेले रणगाडे यांच्याशी कसे नाते तयार होत असेल, याविषयी वेळोवेळी झालेल्या संवादाचे स्मरण झाले. यंत्रे कितीही प्रगत झाली, तरी ती हाताळणारा सैनिक, त्याचे कौशल्य, त्याची चिकाटी, जिगर हे महत्त्वाचे, असे सैनिकी क्षमतांबाबत म्हटले जाते, ते तर खरेच. यंत्रांच्या कितीही मर्यादा असल्या, तरी आपल्या भारतीय सैनिकांनी त्यावर मात करून ईर्षेने विजयश्री खेचून आणली, असे अनेक प्रसंग आहेत. तरीही शेवटी यंत्रांवर सैनिकाची भिस्त असतेच, त्यामुळेच या यंत्रांशी त्यांचे भावनिक नाते दृढ होत जाते. मिग २१ विमानांचेच उदाहरण द्यायचे, तर ६३ वर्षांमध्ये ८०० हून अधिक विमानांनी भारतीय हवाई दलातील अनेक पिढ्या पाहिल्या, घडविल्या. अशा विमानाला ताफ्यातून निरोप देताना कित्येक हवाई दल अधिकाऱ्यांच्या डोळ्यांसमोर आपल्या सैनिकी आयुष्याची कारकीर्दच उभी राहिली असेल. यानिमित्ताने २०१५मधील आयएनएस गोदावरी या फ्रिगेटची व २०१७ मधील 'आयएनएस विराट'ची सेवानिवृत्ती यांचे स्मरण झाले. भारतातच आरेखन केली गेलेली पहिली स्वदेशी बांधणीची युद्धनौका हे आयएनएस गोदावरीचे वैशिष्ट्य. तर जगभरात ५९ वर्षे इतका सर्वाधिक काळ पाण्यात तरंगती राहिलेली (त्यापैकी ३० वर्षे भारतात) विमानवाहू युद्धनौका असे, विराटचे योगदान. युद्धनौकांचे सारथ्य केलेल्या सर्व कमांडिंग ऑफिसरना या निवृत्ती सोहळ्याचे खास निमंत्रण असते. सूर्यास्ताच्या साक्षीने तिरंगा, नौदलाचा ध्वज व निवृत्तीच्या दिवशी धारण केलेला विशेष ध्वज खाली उतरवून बँडच्या धुनेवर या नौकांना आदरपूर्वक निरोप दिला जातो. कित्येक विमाने किंवा युद्धनौकांचा सेवेचा कालावधी हा सैन्याधिकाऱ्यांच्या सैनिकी कारकीर्दीला समांतर असतो. लढाऊ विमानांची तुकडी असो किंवा युद्धनौका; त्यांच्या स्वरूपानुसार प्रत्येक यंत्रालाही एक प्रथा, परंपरा व त्यांची वैशिष्ट्यपूर्ण कार्यसंस्कृती असते. त्या त्या वेळी त्यांच्यावर स्वार झालेले अधिकारी त्या युद्धनौकांची किंवा विमानांच्या तुकडीची कार्यसंस्कृती अंगी धारण करतात व त्याच बलस्थानांमुळे ते ओळखले जातात. मिग २१च्या पँथर्स किंवा कोब्रा या स्क्वाड्रन असोत, किंवा राजपूत श्रेणीतील युद्धनौका म्हणजे आर क्लास, १९७१ च्या युद्धात प्रथम आघाडी उघडलेल्या कॉरव्हेट श्रेणीतील क्षेपणास्त्र नौका म्हणजे किलर स्वाड्रन अशा विविध नावांनी त्यांची ओळख असते. ते एक ईर्षेचे बीज असते. बहुधा त्यामुळेच नौदलातील युद्धनौका या भौतिकदृष्ट्या निवृत्त झाल्या, तरी त्यांचे प्राण कायम राहतात, असे मानले जाते. यानुसार नव्या आधुनिक पिढीतील युद्धनौका पुन्हा जुन्या नावानेच पुनर्जन्म घेतात. परंतु जेव्हा सामग्री व निधीच्या टंचाईमुळे किंवा नियोजनातील समस्यांमुळे एकच एक यंत्रे पुनःपुन्हा वापरावी लागतात, काही तरी जुगाड चालवून त्यांची आयुर्मर्यादा ओढूनताणून लांबवावी लागते, तेव्हा मात्र ते सैनिकांच्या जिवावरच बेतते. अशा वेळी याच यंत्रांना मग उडत्या शवपेट्यांसारखे दूषण चिकटते. विहित कालावधीच्या पलीकडे माणूसही जगत नाही; मग यंत्रे चालविण्याचा आटापिटा केल्यावर तीही मान टाकतात किंवा माणसाच्या जिवाचीच परीक्षा पाहतात. हे टाळता आले, तर यंत्र आणि माणूस दोघांचे प्राण वाचविता येतील.

# स्वैच्छिक रक्तदान सर्वश्रेष्ठ दान



समाजामध्ये रक्तदानाचे महत्त्व रुजविणे व तरुण पिढीला रक्तदानासाठी प्रोत्साहित करणे तसेच त्यांच्यामध्ये रक्तदानाबद्दल जागृती निर्माण करणे, स्वैच्छिक रक्तदानाची संकल्पना रूढ करणे यासारख्या समाजोपयोगी उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी 'राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस' दरवर्षी १ ऑक्टोबरला साजरा केला जातो. त्यानिमित्ताने स्वैच्छिक रक्तदानाबद्दल ही माहिती.

एकविसाव्या शतकात मानवाने आजपर्यंत विज्ञान, आरोग्य, शेती तंत्रज्ञान, औद्योगिक, आधुनिक तंत्रज्ञान, इ.आदी क्षेत्रात भरपूर प्रगती केली आहे. मात्र मानवी रक्ताला दुसरा पर्याय शोधण्यात आजपर्यंत मानवाला अथवा विज्ञानाला यश मिळाले नाही. यासाठी माणसाचा जीव वाचविण्यासाठी माणसाचेच रक्त लागते. यासाठी रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदान जनजागृतीपर केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था, महाराष्ट्र शासन, राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था तसेच वेगवेगळ्या सामाजिक संस्था, औद्योगिक क्षेत्र, महाविद्यालय (एन.एस.एस.आणि एन.सी.सी) आदिंच्या माध्यमातून स्वैच्छिक रक्तदान मोहीम जनजागृतीपर यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे.

राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस सर्वप्रथम १ ऑक्टोबर १९७५ या दिवशी इंडियन सोसायटी ऑफ ब्लड ट्रान्सफ्यूजन अँण्ड इम्यूनो हिमँटोलॉजी या संस्थेच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. इंडियन सोसायटी ऑफ ब्लड ट्रान्सफ्यूजन अँण्ड इम्यूनो हिमॅटोलॉजी या संस्थेची स्थापना २२ ऑक्टोबर १९७१ या दिवशी के.स्वरुप क्रिशेन आणि डॉ. जे.जी. ज्वाली यांनी केली. जागतिक आरोग्य संघटना, रेडक्रॉस आणि रेड क्रेसेंट सोसायटी, इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ब्लड डोनर ऑर्गनायझेशन आणि इंटरनॅशनल सोसायटी ऑफ ब्लड ट्रान्सफ्यूजन यांनी सुरक्षित रक्त आणि रक्त उत्पादकांच्या गरजेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि स्वैच्छिक रक्तदान करून रक्तदान महायज्ञात रुग्णांचे प्राण वाचविणाऱ्या 'स्वैच्छिक रक्तदाता' म्हणून या मोहिमेत सामील झालेल्या रक्तदात्यांचे आभार मानले पाहिजे. हा कार्यक्रम प्रथमच २००४ मध्ये चार प्रमुख आंतरराष्ट्रीय संस्थाद्वारे आयोजित करण्यात आला होता. याला यावर्षी २१ वर्षे पूर्ण होत आहेत.

दरवर्षी आपण राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस साजरा करीत असतो. समाजामध्ये रक्तदानाचे महत्त्व रुजवणे तरुणपिढीमध्ये रक्तदानाबद्दल जागृती निर्माण करणे. प्रोफेशनल डोनर व बदली रक्तदाता ही संकल्पना कालबाह्य करून स्वैच्छिक रक्तदानाची मुहूर्तमेढ रुजवणे निरोगी व तंदुरुस्त असताना देखील जे लोक रक्तदान करीत नाहीत त्यांना रक्तदानासाठी प्रेरणा देणे हा यामागचा हेतू आहे. राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस हा दरवर्षी १ ऑक्टोबरला साजरा करण्यात येतो. याशिवाय संपूर्ण ऑक्टोबर महिन्यामध्ये रक्तदानासंबंधीच्या विविध उपक्रमाचे आयोजन रक्तपेढ्यामार्फत व शासनामार्फत करण्यात येते. चालू वर्षी २०२५ चे घोषवाक्य 'रक्तदान करूया, आशा जागवूया, एकत्रित येऊन जीवन वाचवूया' असे आहे.

### दानाचे महत्त्व

दानाचे महत्त्व आपणा सर्वांनाच ठाऊक आहे यामध्ये अन्नदान, कन्यादान या परंपरागत दानांबरोबरच शास्त्रीय पद्धतीची दाने. उदा. देहदान, अवयदान, नेत्रदान व रक्तदान ही देखील आपण समजून घेतले पाहिजेत. कारण रक्तदान ही काळाची गरज बनली असून रक्ताच्या निर्मितीला अद्यापही मानवाला पर्याय निर्माण करता आलेला नाही.

मानवी शरीरात अंदाजे ५.५ रक्त असते. रक्तामध्ये काही घटक असतात. उदा. तांबड्या पेशी, पांढऱ्या पेशी, रक्तबिंबिका, प्लाजमा इत्यादी. संपूर्ण शरीरभर ऑक्सिजन वाहून नेण्याचे काम रक्त करते. रक्तामधील महत्त्वाचा घटक हिमोग्लोबिन असतो. हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी झाल्यास एनिमिया (पंडू रोग) होतो. रक्ताचे विविध आजार मानवांत पाहायवास मिळतात. उदा. ॲनिमिया, थॅलिसिमिया, हिमोफिलिया, सिकलसेल, ल्युकेमिया, प्लेटलेटचे आजार, कॅन्सर इत्यादी रक्ताशी निगडित काही आजारामध्ये वारंवार रक्त संक्रमण करावे लागते आणि इथेच रक्तदानाचे महत्त्व लक्षात येते. या रक्तदानासंबंधी अमरावतीच्या जिल्हा रुग्णालयाचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. संदेश यमलवाड यांनी विस्तृत माहिती दिली.

### रक्तदान म्हणजे काय?

एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या संमतीने एखाद्या रक्तपेढीत किंवा रक्तदान शिबिरात रक्त देणे म्हणजेच रक्तदान रक्तदान हे स्वैच्छिक असले पाहिजे व कोणत्याही मोबदल्यात रक्तदान करणे, बदली रक्तदाता होणे या रक्त दात्याच्या संकल्पना कालांतराने पुसट करून स्वैच्छिक रक्तदानाची मोहीम जनमानसात रुजवणे हेच या रक्तदान दिवसाचे महत्त्व असते. ज्या माणसाचे वय १८ ते ६० वर्ष, हिमोग्लोबिन १२.५ पेक्षा जास्त, वजन ४५ किलो पेक्षा जास्त नाडीचे ठोके ८० ते १०० प्रतिमिनिट, तापमान ३७.५ रक्तदाब नियमित व जर आधी रक्तदान केले असेल तर ३ महिने पूर्ण झालेल्या कालावधी इत्यादी घटक जो रक्तदाता पूर्ण करतो तोच रक्तदान करू शकतो.

### रक्तदान का करावे

दान केल्याचे समाधान मिळते. शरीरात रक्त निर्मितीस चालना मिळते. रक्तातील कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते. कर्करोग किंवा हृदयरोगासारख्या आजारांच्या धोक्याचे प्रमाण कमी होते. शरीरातील ५.५ रक्तामधून ३५० ते ४५० मिली रक्त एका रक्तदानात दान करता येते. हे रक्त २४ तासात भरून निघते तसेच हिमोग्लोबिन व रक्त घटक दोन महिन्यात पूर्वपदावर येतात. रक्तदान केल्याने काही अपाय होईल का अशी अनामिक भीती काहीच्या मनात असते. परंतु रक्तदानाने तोटा काहीच नसून रक्तदानाचे फायदेच अधिक आहेत. कोणत्याही शासनमान्य रक्तपेढीत व रक्तदान शिबिरात रक्तदान करता येते असेही डॉ. संदेश यमलवाड यांनी सांगितले.

नवजात लहान बालके, प्रसुतीपूर्व प्रसवणाऱ्या व प्रसुतीपश्चात माता. अपघात किंवा युद्धात झालेल्या अतिरक्तस्त्रावानंतर रक्ताशी निगडित अनुवंशिक आजारामध्ये (उदा. थॅलीसिमिया, हिमोफिलिया, सिकलसेल, ॲनिमिया) साथीच्या रोगाचे रुग्ण (उदा. मलेरिया, डेंग्यू), रक्तघटकांशी निगडित आजारीत रुग्ण, जडीत रुग्ण प्रथिनांची कमतरता असणारे रुग्ण, डायलिसिस चे रुग्ण, कॅन्सरचे रुग्ण यांच्यासाठी रक्तदान करता येते. रक्तदान ही एक सामाजिक संकल्पना म्हणून रुजवली गेली पाहिजे युवक युवतींनी रक्तदानाचे महत्त्व समजून घेऊन मोठ्या प्रमाणात रक्तदान केले पाहिजे. आपण वर्षातून चार वेळेस दर तीन महिन्याच्या अंतराने रक्तदान करू शकतो. रक्तदानानंतर प्रत्येक शासकीय रक्तपेढी तर्फे एक रक्तदाता कार्ड देण्यात येते. ज्यावर अडचणीच्या प्रसंगी कोणत्याही शासकीय रक्तपेढीतून रक्त साठ्याच्या उपलब्धतेनुसार एक रक्तपिशवी मोफत देण्यात येते. या कार्डची वैधता दोन वर्षापर्यंत असते. रक्तदानानंतर प्रत्येक रक्त पिशवीची रक्तपेढीत तपासणी करून (एचआयव्ही, एचबीव्ही, एचसीव्ही, (कावीळ), सिफीलीस व मलेरिया) तपासणीअंती निर्दोष असणारी रक्तपिशवीच रक्तपेढ्यांतर्फे रुग्णांना वितरित केली जाते. आता वैज्ञानिक उत्क्रांतीमुळे रक्तातील घटक देखील वेगळे करून गरजेनुसार रुग्णांना देता येऊ शकते. (उदाहरणादाखल तांबड्या रक्तपेशी, थैलीसीमिया रुग्ण रक्तबिंबिका-डेंग्यू मलेरियाचे रुग्ण प्लाजमा-जळीत रुग्ण लिव्हरचे आजार, फॅक्टर ८ व ९ हिमोफिलिया रुग्ण.)

### रक्तदानाची उपयोगिता

ए, बी, ओ, एबी हे मूलभूत रक्तगट असून प्रत्येकाचे पॉझिटिव्ह व निगेटिव्ह असे प्रकार पडतात. त्यापैकी 'ओ' निगेटिव्ह हा युनिवर्सल रक्तदाता असून एबी पॉझिटिव्ह हा युनिव्हर्सल रक्त घेणारा या प्रकारात मोडतो. वैज्ञानिक संशोधनामुळे अजूनही रक्तगटाचा अभ्यास होऊन रक्तगटाचा शोध लागला आहे, लागत आहे. रक्त कधी आणि कोणाला लागेल, याची खात्री देता येत नाही. त्यामुळे रक्तदानाबद्दल नियमित जनजागृती करून रक्तदान चळवळीला सर्वांनीच हातभार लावण्याची गरज आहे.

निगेटिव्ह ग्रुपच्या रक्तदात्यांचे रक्त नेहमी राखीव ठेवल जाते. त्यातल्या त्यात एबी निगेटिव्ह हे अत्यंत दुर्मिळ रक्तगट आहे. त्यासाठी गरज पडेल तसे एबी निगेटिव्ह रक्त दात्यांना रक्त केंद्रात बोलावल जाते आणि रक्तदान करण्यास मदत करावयास सांगितले जाते. मानवी शरीरात कमीत कमी पाच लीटर रक्त असते. शरीरातील पाच लिटर रक्तापैकी ४५० किंवा ३५० मिली रक्त घेतले जाते. ते रक्त २१ दिवसात शरीरात पुन्हा तयार होते. त्याच रक्तदात्याकडून पुन्हा रक्तदान करावयाचे असल्यास ९० दिवस अंतर ठेवूनच रक्तदान करावे, असे कायदे आहेत. रक्तदात्याचे किमान वजन ४५ पेक्षा जास्त असावे. १८ ते ६५ वर्ष या वयोगटातील कोणालाही रक्तदाता होता येते. मात्र त्याच्या शरीरातील हिमोग्लोबीनचे प्रमाण १२.५ ग्रॅम पर डेसीलिटर पेक्षा जास्त असावे. निरोगी मनुष्य दर तीन महिन्यांनी रक्तदान करू शकतो. जर तो मद्यपी असेल तर मद्यपानानंतर ४८ तासांनी रक्तदान करू शकतो. महिला मासिक पाळीचा काळ वगळता नियमित रक्तदान करू शकतात. मात्र हिमोग्लोबीनचे प्रमाण हे १२.५ ग्रॅम पेक्षा अधिक असावेत. प्रसुतीनंतर एक वर्षभर रक्तदान करता येत नाही. मानवी शरीरात ३५ हून अधिक रक्त समूह प्रणाली आढळली आहे. त्यातील एबीओ आणि आर एच रक्त समूह प्रणाली अत्यंत महत्त्वाची आहे.अनेक प्रकारचे रक्तगट आहेत. ते सर्वत्र उपलब्ध रहाण्याकरता रक्त देवाण-घेवाण अखंडपणे कार्यरत असणे अत्यावश्यक असते.

रक्त शिबिरे यांचे समान वाटप जिल्ह्यात करण्यात आले पाहिजे. जेणेकरून रक्त तस्करी म्हणजेच रक्त आणि रक्त घटके वितरण व्यवसाय होणार नाही. राष्ट्रीय रक्त धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले गेले पाहिजे. शासकीय रक्तपेढी ही प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थापित करून ती अधिक सक्षम करण्यात यावी, जेणेकरून निःशुल्क वितरण सर्वांना मिळेल. याचा फायदा सर्वसामान्य गरजू रूग्णांना होईल व अनेकांना जीवदान मिळू शकेल.

### सक्रीय सहभाग महत्त्वाचा

समाजाचा एक जबाबदार नागरिक म्हणून निःस्वार्थीपणे, समाजहितासाठी, राष्ट्रसेवा म्हणून रक्तदान महत्त्वाचे. ऐच्छिक रक्तदाता म्हणून व्हॉट्सअप ग्रुप, सोशल मीडिया, डिजिटल माध्यमातून रक्तदान शिबीर तसेच रक्तदाता नोंदणी संपर्क अभियान राबवून रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी मदत होऊ शकते. रक्तदान अभियान राबविण्यात येणाऱ्या आरोग्य सेतू पोर्टल https://eraktkosh.mohfw.gov.in/ या वेबसाईटवर रजिस्टर नोंदणी करून ऐच्छिक रक्तदान करुन रक्तदानाबद्दल ऑनलाईन रक्तदान प्रमाणपत्र देता येते. या रक्तदान मोहिमेत आपणही सहभागी होऊन आपण रुग्णांचे प्राण वाचविण्याचे पवित्र काम करु शकता. अनेक सेवाभावी संस्था, सामाजिक संस्था आणि सामान्य माणसांनीही रक्तदानासाठी मोठ्या प्रमाणावर पुढे यायला हवे. त्यामुळेच देशात आवश्यक तेवढा रक्तसाठा उपलब्ध होईल. रक्तदान हे महान कार्य आहे तसेच मानवी रक्ताची गरज कधीही न संपणारी असल्यामुळे रक्तदानाविषयी प्रेरणा समाजात दृढ करणे, निरोगी रक्तदात्यांची फौज उभी करून रक्तदात्यांमध्ये ऐच्छिक रक्तदानाविषयी जनजागृती करणे, सामाजिक बांधिलकी जोपासून रक्तदात्यांविषयी कृतज्ञता निर्माण व्हावी, या मागचा एवढाच उद्देश.

**– अनिल आलुरकर**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती
कार्यालय, अमरावती

# सौंदर्यप्रसाधन क्षेत्रातील यशस्वी अंबिका

वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी लग्न, सात वर्षांत घटस्फोट, दोन वर्षांच्या मुलीचा एकल पालक म्हणून सांभाळ, १९९० मध्ये उद्योगात मैत्रिणीकडून दगा, तर १९९६ मध्ये दुसऱ्या मित्राकडून सलून व्यवसायात फसवणूक, पहिल्या उद्योगात ७ लाखांचे नुकसान अशा प्रकारे अनेकवेळा अपयश पाहून ती खचली नाही. पडली, पुन्हा उभी राहिली. हार न मानल्यानेच आज ती १० कोटींपेक्षा अधिक उलाढाल असलेल्या कंपनीची सर्वेसर्वा आहे. ही संघर्ष कथा आहे सौंदर्य प्रसाधन क्षेत्रातील यशस्वी उद्योजिका अंबिका पिल्लई यांची.

२६ नोव्हेंबर १९६२ रोजी केरळमधील कोल्लम येथे अंबिकाचा जन्म झाला. अंबिकाला बालपणी डिस्लेक्सियाचा सामना करावा लागला. तिला लेखन करण्यात आणि गणित या विषयात अडचणी येत होत्या. तत्कालिन भारतीय परंपरेनुसार वयाच्या १७ व्या वर्षी तिचे लग्न झाले. मात्र लवकरच तिला वैवाहिक जीवनात निराशा सहन करावी लागली. सात वर्षांच्या वैवाहिक प्रवासानंतर २४ व्या वर्षी तिचा घटस्फोट झाला. दोन वर्षांच्या आपल्या तान्ह्या मुलीसह ती दिल्लीला गेली. करिअरच्या अनेक पर्यायांचा विचार केल्यानंतर, तिने हेअरस्टायलिस्टचा कोर्स करण्याचा निर्णय घेतला.

आपल्या मुलीला चांगले जीवन देण्याचा तिने दृढनिश्चय केला. अंबिकाचे वडील श्रीमंत होते पण तिने कधीही त्यांच्याकडून एक पैसाही घेतला नाही कारण तिला स्वतःच्या आयुष्यात काहीतरी करायचे होते. १९९० मध्ये, तिने एका सलूनमध्ये काम करायला सुरुवात केली. तिचा पगार २००० रुपये होता. यातील अर्धे पैसे घरभाड्याला जाई तर उरलेले अर्धे घरखर्चावर खर्च होत असे. काही महिने काम केल्यानंतर तिला जाणवले की आपण स्वतःचे सलून सुरू करू शकतो. तिने एका मैत्रिणीसोबत भागीदारी करण्याचा निर्णय घेतला पण त्या मैत्रिणीची एक अट होती की सलून तिच्या नावावर असले पाहिजे. ही अट मान्य करत अंबिकाने भागीदारी मध्ये व्यवसाय सुरू केला. वडिलांकडून ७ लाख रुपये कर्ज घेतले. अशाप्रकारे तिचे पहिले सलून १९९० मध्ये सुरू झाले.

सात वर्षांनंतर तिला सलूनच्या बँक खात्यांमध्ये गडबड वाटली. व्यवहारात तफावत दिसली आणि तिच्या मैत्रिणीशी तिचा वाद झाला. तिने मैत्रिणीसोबत व्यावसायिक भागीदारी रद्द करण्याचा निर्णय घेतला तेव्हा तिला ७ लाख रुपयांची गुंतवणूक परत मिळाली नाही. तिच्याकडे काहीही उरले नव्हते. पुन्हा शून्यापासून तिला सुरुवात करावी लागली. एका मैत्रिणीने तिला अपयश दिले, तर दुसऱ्या मित्राने तिला आधार दिला. फॅशन डिझायनर हेमंत त्रिवेदी हे अंबिकाचे चांगले मित्र आणि तिच्यासाठी आधारस्तंभ ठरले. त्या काळात दिल्लीत एखादा कार्यक्रम असेल तर मुंबईतील डिझायनर्स स्वतःचे हेअर ड्रेसर आणि मेकअप आर्टिस्ट घेऊन जायचे. अशाच एका कार्यक्रमासाठी हेमंत त्रिवेदी यांनी अंबिकाला हेअरस्टाईलिंग आणि मेकअपही करायला सांगितले. त्यानंतर दुसऱ्यांदा त्यांनी एकत्र काम केले ते ऐश्वर्या रायच्या ताल चित्रपटासाठी. या चित्रपटातील मेकअपसाठी अंबिकाला आयफाचा (इंटरनॅशनल इंडियन फिल्म अकादमी) पुरस्कार मिळाला जो तिचा पहिला पुरस्कार होता.



१९९६ मध्ये, तिने पुन्हा एका मित्रावर विश्वास ठेवत त्याच्यासोबत भागीदारीमध्ये दिल्लीत सलून सुरू केले. पण त्यानेही तिला फसवले. एके दिवशी २२ वधूंचे मेकअप करण्यात आले होते; परंतु त्या दिवशीच्या अकाऊंटमध्ये फक्त दोनच मेकअपचा उल्लेख करण्यात आला होता.

२००८ मध्ये मात्र तिने स्वतःला सावरले. दुसरे कर्ज घेतले आणि अंबिका पिल्लई नावाने स्वतःचा व्यवसाय सुरू केला. हा व्यवसाय आता तिचा ब्रँड झाला आहे. यावेळी तिने व्यवहार पाहण्यासाठी सॉफ्टवेअर सिस्टम तयार केली. काही वर्षांच्या कालावधीत तिने संपूर्ण दिल्लीत १२ शाखा उघडल्या.

काही वर्षांपूर्वी अंबिकाने 'कायत्र' ही हर्बल उत्पादनांची श्रेणी सुरू केली. हेयर केअर, स्कीन केअर आणि मेकअप अशा वर्गातील उत्पादने तिच्याकडे उपलब्ध आहेत. २५० रुपयांपासून ते अगदी १,२५० रुपयांपर्यंत या उत्पादनांचे मूल्य आहे. २०१० मध्ये

११ कर्मचाऱ्यांसह आणि दिवसाला जेमतेम पाच क्लायंटसह सुरुवात केलेल्या, अंबिका पिल्लई डिझायनर सलून प्रायव्हेट लिमिटेड आज १५० कर्मचाऱ्यांसह १० कोटींपेक्षा अधिक रुपयांची उलाढाल करत आहे.

एक काळ असा होता जेव्हा अंबिका सकाळपासून रात्रीपर्यंत काम करत असे. मात्र आता तिचा वेग मंदावला आहे. तिने आयुष्यभर खूप कष्ट केले. इतके की तिच्या अंगठ्याला आणि गुडघ्याला दुखापत झाली होती. मात्र आता वयोमानानुसार तिने काम कमी केले आहे. ती आता फक्त १२ ते ५ काम करते. कोरोना काळात तिने दिल्लीतील बहुतेक सलून बंद केले आहेत.

भविष्यातील तिच्या काही योजना आहेत. काही वर्षांत तिला निवृत्त व्हायचे आहे आणि स्वतःचे रेस्टॉरंट सुरू करायचे आहे. प्रवास करायचा आहे. पुस्तके लिहायची आहेत. अशा गोष्टी करायच्या आहेत ज्यासाठी तिला कधीही वेळ देता आला नव्हता. तिची मुलगी कविता नुकतीच कंपनीत भागीदार म्हणून सामील झाली आहे. जनरल मॅनेजर म्हणून कंपनीची धुरा ती सांभाळत आहे.

आज अंबिका सौंदर्य प्रसाधन क्षेत्रातील प्रसिद्ध नाव आहे. फेसबुक पेजवर ती सौंदर्य विषयक टिप्स आणि ट्रिक्स उदारपणे शेअर करते. तब्बल ८.९९ लाख लोक तिला फॉलो करतात.

तिने २००७ मध्ये भारत निर्माण सुपर अचिव्हर्स अॅवॉर्ड, २००९ मध्ये बेस्ट हेअर अँड मेकअपसाठी कॉस्मोपॉलिटन फन फियरलेस फीमेल अॅवॉर्ड आणि २०११ मध्ये व्होग बेस्ट मेकअप आर्टिस्ट अॅवॉर्ड असे अनेक पुरस्कार जिंकले आहेत. इतकं अपयश पचवून यशस्वी झालेल्या अंबिका पिल्लई प्रत्येक व्यक्तीसाठी प्रेरणादायी आहेत.

**– अर्चना सोंडे**

****

# जालना शहरातील आपत्तीग्रस्तांना घरकुलासह नुकसान भरपाई द्यावी!

## छावाचे जिल्हा कार्याध्यक्ष करण जाधव पाटील यांची मागणी

जालना दि.३ (प्रतिनिधी)– जालना शहरात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून आपत्तीग्रस्तांना घरकुलांसह ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी छावा मराठा संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष करण जाधव पाटील यांनी प्रशासनाकडे केली आहे.

जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांना दिलेल्या लेखी निवेदनात करण जाधव पाटील यांनी म्हटले आहे की, नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरातील संजय नगर , शंकर नगर, भवानीनगर ,रमाबाई नगर, परिसरातील गोरगरीब व मध्यमवर्गीय असलेल्या शेकडो कुटुंबांतील अन्नधान्य, इलेक्ट्रॉनिक वस्तू, शैक्षणिक व अन्य महत्त्वाची कागदपत्रे, तसेच घरगुती वस्तूंचे अतोनात नुकसान झाले असून घरांची पडझड झाली आहे. या सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे करून आपत्तीग्रस्तांना घरकुलांसह ५० हजार रुपये मदत तात्काळ द्यावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी करण जाधव पाटील, वशिष्ठ माने, सुनील हिवाळे, प्रदीप मुरमे, राधेश्याम जोशी, राजू सतकर, रहीम शेख, रोहित जाधव ,अशोक लाड, सिद्धेश्वर देशमाने, मंगेश लोंढे, आदींची उपस्थिती होती.



# औरंगाबाद विभागातील पदवीधर विधान परिषद मतदार संघासाठी मतदार यादीत नव्याने नाव नोंदणी करावी

जालना दि.३ (प्रतिनिधी)– भारत निवडणूक आयोगाने दि.१.११.२०२५ या अर्हता दिनांकावर आधारित औरंगाबाद विभागातील पदवीधर विधान परिषद मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम जाहिर केला आहे. तरी जिल्ह्यातील पात्र पदवी धारकांनी या मतदार यादीत नव्याने नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

मतदार नोंदणी अधिनियमान्वये जाहिर सूचना मंगळवार दि.३० सप्टेंबर २०२५ प्रसिध्द करण्यात येईल. नोटीसीची पुर्नप्रसिध्दी १५ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रथम करण्यात येईल. नोटीसीची द्वितीय पुर्नप्रसिध्दी २५ ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात येईल. हरकती व दावे गुरुवार दि.६ नोव्हेंबर २०२५ रोजीपर्यंत स्विकारण्यात येतील. हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई गुरुवार दि.२० नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात येईल.

प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी दि.२५ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात येईल. दावे व हरकती स्विकारण्याचा कालावधी दि.२५ नोव्हेंबर ते दि.१० डिसेंबर २०२५ पर्यंत राहील. दावे व हरकती निकाली काढण्याचा दिनांक व पुरवणी यादी तयार करणे व छपाई दि.२५ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात येईल. आणि मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी मंगळवार दि.३० डिसेंबर २०२५ रोजी करण्यात येईल.

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघासाठी जालना जिल्ह्यातील प्रत्येक तहसील स्तरावर नमुना अर्ज क्र.१८ वाटप व स्विकारण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. असेही कळविले आहे.

# इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत

जालना दि.३ (प्रतिनिधी)– इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सुरू करण्यात आली आहे. सदर योजनांचा लाभ घेण्यासाठी दि. ३० सप्टेंबर २०२५ ते २६ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत १२ वी नंतरच्या बिगर व्यावसायिक, व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत. आणि या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी व वसतिगृह प्रवेशापासून वंचित असलेल्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेसाठी प्रवेश अर्ज मागविण्यात आले आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. यावर्षीची दि. १ सप्टेंबर २०२५ पासून वसतीगृह प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

# पोलीस पाटील भरती अर्जाकरीता मुदतवाढ अर्ज करण्यासाठी २ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

जालना दि.३ (प्रतिनिधी)– जालना जिल्ह्यातील उपविभागीय दंडाधिकारी जालना, अंबड, भोकरदन व परतूर यांच्यामार्फत सुरू असलेल्या पोलीस पाटील भरती–२०२५ कार्यक्रमासाठी ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत वाढविण्यात आली आहे. यापूर्वी अर्ज करण्याची शेवटची तारीख ३० सप्टेंबर, २०२५ रात्री ११:५९ वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली होती. परंतु जिल्ह्यातील पुरपरिस्थिती व पर्जन्यमानाचा विचार करून अर्ज करण्याची मुदत गुरुवार, २ ऑक्टोबर, २०२५ रोजी रात्री ११:५९ वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे. याबाबत अधिकृत सूचना जिल्हा प्रशासनाच्या www.jalna.nic.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असुन, परिक्षार्थ्यांनी त्याची नोंद घ्यावी, असे आवाहन अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

# शिबिरात १५५ महिलांची गर्भाशय मुखाची मोफत कर्करोगपूर्व तपासणी

## नारी सशक्त असेल तरच समाज खऱ्या अर्थाने सशक्त होतो–संतोष खांडेकर

जालना दि.३ (प्रतिनिधी)– स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान अंतर्गत लायन्स क्लब ऑफ जालना डायमंड व जालना महानगरपालिकेच्या शहरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. ३० सप्टेंबर रोजी सिंगल जीन भागातील अंकुर हॉस्पिटलमध्ये आयोजित गर्भाशय मुखाच्या कर्करोगपूर्व मोफत तपासणी शिबिराचा १५५ महिलांनी लाभ घेतला. यापैकी संशयित २५ महिलांची पॅप स्मीअर ही महत्त्वाची चाचणी करण्यात आली.

या शिबिराचे उद्घाटन लॉयन्स क्लब डायमंडचे मार्गदर्शक सुभाषचंद्र देवीदान यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी जालना महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे, डॉ. दिपक भालेराव, अंकुर हॉस्पिटलचे संचालक व स्त्रीरोग तज्ञ तसेच लायन्स क्लब ऑफ जालना डायमंडचे सचिव डॉ. रामकृष्ण गौल, अमोल बांगड, सुनील बियाणी, बालाजी बांडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी श्री. खांडेकर म्हणाले की, नारी सशक्त असेल तरच समाज खऱ्या अर्थाने सशक्त होतो. महिलांचे आरोग्य हे कुटुंब व समाजाच्या सुदृढतेशी थेट निगडित आहे. भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे अधिक महिलांपर्यंत पोहोचणे हे आपले ध्येय आहे. श्री. देविदान म्हणाले की, गर्भाशय मुखाचा कर्करोग हा वेळेत निदान झाल्यास टाळता येणारा आजार आहे. त्यामुळे प्रत्येक महिलेनं नियमित तपासणी करून स्वतःचं व कुटुंबाचं आरोग्य जपणं अत्यावश्यक आहे. या मोहिमेमुळे अनेक कुटुंबांना नवी आशा आणि सुरक्षितता मिळणार आहे. डॉ. गौल यांनी महिलांमधील गर्भाशय मुखाच्या कर्करोगपूर्व तपासणीचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की या शिबिरात संशयित २५ महिलांच्या पॅप स्मीअर चाचणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित महिलांना योग्य उपचार व सल्ला दिला जाणार आहे. याप्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, आरोग्यसेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आशा स्वयंसेविका तसेच क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुनील बियाणी यांनी केले.




# सामाजिक वनीकरण मजुरांचा ऐतिहासिक विजय, सेवा सातत्यसह पुनर्नियुक्ती आणि नुकंसान भरपाईचे माननीय कामगार न्यायालयाचे आदेश

जालना दि.३ (प्रतिनिधी)– अन्यायकारक बडतर्फीविरोधात न्यायाची लढाई लढणाऱ्या सामाजिक वनीकरण विभागातील मजुरांना माननीय कामगार न्यायालय, जालना यांनी मोठा दिलासा दिला आहे. न्यायालयाने विभागाचे बडतर्फी आदेश रद्द करून मजुरांना सेवेत सातत्य देत पुन्हा कामावर घेण्याचा आदेश दिला आहे. यासोबतच कामगारांना भरपाईही देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या निकालामुळे मजुरांच्या संघर्षाला न्याय मिळून मजुरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

शंकर लोखंडे, गणेश जाधव, सुंदराबाई साठे, शेशराव भालेराव, दिलीप पांडव, सोनाजी घारे, सुंदर बोराडे, संजय गोफणे व विश्वनाथ इंगोळे या मजुरांनी न्यायालयीन लढ्यात यश मिळवले.

या प्रकरणात मजुरांचे बाजू मांडण्याचे काम वरिष्ठ वकील ॲड. माधवी थत्ते मॅडम यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. या विजयामुळे इतर मजुरांनाही प्रेरणा मिळाली आहे.

ही लढाई दिवंगत कॉ. प्रकाश बोडवडे यांच्या प्रयत्नांमुळे सुरू झाली होती. त्यांच्या अथक संघटनात्मक कार्यामुळेच हा निकाल आज मिळू शकला, असे मत वनमजुरांकडून व्यक्त करण्यात आले. त्यांच्या कार्याला सलाम करण्यासाठी वकिलांसह सर्व मजुरांनी न्यायालयाबाहेर एकत्र जमून कृतज्ञता व्यक्त केली.

या प्रसंगी मराठवाडा सर्व श्रमिक संघटनेचे संयुक्त सचिव सोहम प्रकाश बोडवडे यांनी आवाहन केले की ''सामाजिक वनीकरण विभागातील सर्व मजुरांनी आपल्या कायदेशीर हक्कासाठी पुढे यावे. संघटित संघर्ष व कायदेशीर लढा केल्यास न्याय नक्की मिळतो, हे या प्रकरणातून सिद्ध झाले आहे. मजुरांनी अन्याय सहन न करता हक्कांसाठी संघटित व्हावे.''







# बंजारा समाजाच्या शिष्टमंडळाने घेतली जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची भेट

जालना दि.३ (प्रतिनिधी)– जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या शिष्टमंडळाने बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची भेट घेवून सविस्तर चर्चा केली. भारतामधील काही राज्यात बंजारा समाजाचा समावेश अनूसूचित जमातीमध्ये आहे. तरी महाराष्ट्रातील बंजारा समाजाचाही हैद्राबाद गॅझेटियरचा आधार घेत अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यासाठी बंजारा समाजाच्या शिष्टमंडळाने चर्चात्मक संवाद साधला. याप्रसंगी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बंजारा समुहाच्या शिष्टमंडळाशी आस्थेने व सुहृदयतेने संवाद साधत त्यांचे म्हणने ऐकुन घेतले. आपल्या मागण्या या शासनापर्यंत पोहचविण्यासाठी प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असेही सांगितले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री.धुमाळ, हरिष राठोड, श्रीकांत राठोड यांच्यासह संबंधित शिष्टमंडळातील पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

जालना दि.३ (प्रतिनिधी)– जिल्ह्यात दसरा विजयादशमी, दर्गामाता दौड समाप्ती, शिवसेना मेळावा, धम्मचक्र प्रवर्तन दिन तसेच कोजागिरी पौर्णिमा या सण, उत्सव आणि इतर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.१३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी जारी केले आहेत.

संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. ३० सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी– कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# सफाई कामगार आणि वारसांचे तीन दिवसांपासून आमरण उपोषण

जालना दि.३ (प्रतिनिधी)– जालना नगरपरिषद तथा विद्यमान महानगरपालिकेच्या आरोग्य व स्वच्छता विभागात आस्थापनेवर सेवेत कार्यरत असतांना मृत पावलेल्या तसेच नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती आदेश देण्यासाठी कामगारांसह वारसांनी तीन दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले असून बुधवारी ( ता. ०१) पर्यंत मनपा प्रशासनाने त्यांची दखल घेतली नाही.

लाड –पागे समितीच्या शिफारशीनुसार शासन निर्णयाप्रमाणे वारसांना रिक्त जागेवर नियुक्ती मिळण्यासाठी कर्मचाऱ्यांनी यापूर्वी नगरपरिषद, महानगरपालिका,नगरपरिषद संचालनालय आयुक्त,सफाई कामगार आयोग अध्यक्ष यांना वेळोवेळी अर्ज, निवेदने , देऊन उपोषणे केली. मात्र अद्याप पर्यंत सफाई कामगार पदी नियुक्ती देण्यात आली नसल्याने संतोष कांबळे, किरण कांबळे ,किशोर फतेलष्करी, रंजना राजगिरे, आसराबाई अंभोरे ,कलाबाई साबळे, जनाबाई अंभोरे ,सुनीता बोर्डे ,आनंदा अंभोरे, विजय हिवाळे ,अब्दुल्ला बदर बदाम यांच्या सह सफाई कामगारांनी तीन दिवसांपासून आमरण उपोषण सुरू केले आहे.




# जालना महानगर जिल्ह्याच्या सरचिटणीस पदी सुनील सुभाष पवार

जालना दि.३ (प्रतिनिधी)– भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्ह्याच्या सरचिटणीस पदी सुनील सुभाष पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ही नियुक्ती प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व पक्षश्रेष्ठींच्या मान्यतेनुसार, जालना महानगर जिल्हा अध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे.



सुनील पवार यांनी संघटन कौशल्य, पक्षनिष्ठा आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये विशेष ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या नियुक्तीने कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पक्षनेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे पाटील, माजी मंत्री बबनराव लोणीकर, आमदार नारायणभाऊ कुचे, आमदार संतोषभाऊ दानवे, माजी आमदार कैलास गोरंट्याल व जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे आदींनी त्यांचे अभिनंदन करून भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# धनगर समाज बांधवांनी केला जिल्हाभर चक्काजाम!, वाहनांच्या लांबच लांब रांगा, महिलांचा ही सहभाग

जालना दि.३ (प्रतिनिधी)– धनगर समाजाला भारतीय संविधानातील कलम ३४२ ( १) मधील यादी क्रमांक ३६ नुसार एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी यासाठी १५ दिवसांपासून आमरण उपोषणास बसलेले दीपक बोऱ्हाडे यांच्या समर्थनार्थ धनगर समाज बांधवांनी बुधवारी ( ता. ०१) जिल्हाभरात चक्काजाम आंदोलन केले. राष्ट्रीय महामार्गांसह प्रमुख मार्गांवर आंदोलनामुळे वाहतूक कोंडी होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

जालना शहरात अंबड चौफुली, विशाल कॉर्नर, येथे सकाळी ११.०० ते ०१.०० या वेळेत महिला व समाजबांधवांनी दोन तास रास्ता रोको आंदोलन केले. येळकोट ,,, येळकोट,,,जय मल्हार ....,आरक्षण आमच्या हक्काचं....,नाही कुणाच्या बापाचं..., विरोबाच्या नावानं चांगभलं राष्ट्रमाता महाराणी अहिल्यादेवी होळकरांचा विजय असो ..., मल्हारराव होळकरांचा विजय असो..., अशा घोषणा देत आंदोलकांनी महामार्ग दणाणून सोडले. यावेळी शिवप्रकाश चितळकर, डॉ.प्रकाश इंगळे, निखिल वीर, सर्जेराव सरोदे,भगवान कावळे, संतोष काळे, नितीन कानडे,रामराव कोल्हे,निवृत्ती वीर, यांच्या सह समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान काजळा फाटा,वाटूर फाटा,अंबड, वडीगोद्री, जामखेड, धुळे– सोलापूर महामार्ग,घनसावंगी,बदनापूर,हसनाबाद,राजुर ,भोकरदन –सिल्लोड रोड, मंठा परतूर येथे ही रास्ता रोको आंदोलने करण्यात आली.

दरम्यान गुरुवारी ( ता. ०२) दीपक बोऱ्हाडे यांच्या उपोषण स्थळी राज्यभरातील निवडक समाज बांधवांची बैठक होणार असून पुढील आंदोलनाची दिशा निश्चित केली जाईल असे सांगण्यात आले.

अंबड शहरात दीडतास रास्ता रोको

अंबड– भारतीय संविधानातील कलम ३४२(१) असलेल्या अनुसूचित जमाती यादी क्रं ३६ वर असलेल्या नोंदीप्रमाणे धनगर समाजाला एस.टी. आरक्षणाची अमलबजावणी करण्यासाठी दिपक बो–हाडे जालना येथे आमरण उपोषण करीत असुन त्यांनी धनगर आरक्षणासाठी राज्यभर चक्काजाम आंदोलनाची हाक देण्यात आल्याने बुधवारी ( ता. ०१) सकाळी ११ ते १२:३० या वेळेत अंबड –जालना व अंबड – पाचोड रस्ता रोखून धरला होता. तब्बल दिडतास अंबड येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ चक्काजाम आंदोलन करण्यात आले.धनगर आरक्षण अमलबजावणीच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.सरकारने आरक्षण न दिल्यास मुंबई आणि दिल्लीत मेंढ्या घेवून येणार असल्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.यावेळी भालचंद्र भोजने, इंजि.बाबासाहेब भोजने,अँड.लक्ष्मण गायके ,अँड .सतीश भावले,कुंडकर,अभ्यासक राम लांडे यांची भाषणे झाली.चक्काजाम आंदोलनामुळे अंबड ते लालवाडी,अंबड ते शिरनेर, अंबड ते सुतगिरणी पर्यंत शेकडो वाहनांच्या रांगा लागलेल्या दिसून आल्या.

# मागासलेपणामुळे डाव्या विचारसरणीचा अतिरेकीवाद पसरला आहे, असा प्रचार करणारे लोक देशाची दिशाभूल करत आहेत

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री तसेच भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते अमित शाह यांनी अलीकडेच 'भारत मंथन-२०२५: नक्सलमुक्त भारत, पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली लाल दहशतवादाचा अंत' या समारोप सत्राला संबोधित केले. या वेळी शाह यांनी स्पष्ट केले की, जे लोक प्रचार करत आहेत की डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीपणाचे मूळ कारण विकास आहे, ते देशाची दिशाभूल करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ३१ मार्च, २०२६ पर्यंत भारत नक्षलवादमुक्त होईल.

देशातील लोकांना माहिती आहे की नक्षलवाद हा एक भयंकर आजार होता, जो अनेक दशकांपासून भारताच्या अंतर्गत सुरक्षा, विकास आणि स्थिरतेला क्षीण करत होता. एकेकाळी असे म्हटले जात होते की पशुपतीनाथ ते तिरुपती पर्यंत पसरलेला ''रेड कॉरिडॉर'' देशासाठी सर्वात मोठा धोका होता. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि नक्षलमुक्त भारताचे शिल्पकार अमित शहा यांच्या निर्णायक धोरणांमुळे, तोच रेड कॉरिडॉर आज विनोदाचा विषय ठरला आहे.

देशातील जनतेला हे देखील माहित आहे की काँग्रेस पक्षाने नक्षलवादाला कधी गंभीरतेने घेतले नाही. मतदारसंघाच्या राजकारणासाठी तर कधी वैचारिक तडजोडीसाठी, नक्षलवादाला थेट आव्हान देण्याऐवजी त्यासाठी जागा तयार करून दिली. डाव्या पक्षांच्या दुहेरी स्वभावामुळेही हा आजार वाढत राहिला. सत्तेत येण्यापूर्वी पश्चिम बंगालमधील वामपंथ्यांनी नक्षलवादाला मोकळीक दिली आणि सत्तेत आल्यावर त्याचाच नायनाट केला. म्हणजेच त्यांचे राजकीय स्वार्थ पूर्ण झाल्यानंतर नक्षलवाद निरुपयोगी ठरला. यावरून स्पष्ट होते की विकास न पोहोचण्यामागचे खरे कारण मागासलेपण नव्हे, तर शस्त्रबंद उग्रवाद होता.

भारत मंथन-२०२५ च्या समारोपातून हे दिसून आले की नक्षलवाद संपवण्याच्या दिशेने झालेले ऐतिहासिक परिवर्तन हे २०१४ नंतरच शक्य झाले. त्याआधी, जम्मू आणि काश्मीर, ईशान्य आणि डाव्या विचारसरणीचे कॉरिडॉर - हे तीन हॉटस्पॉट्स भारताच्या अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करत होते.

परंतु गृहमंत्रिपदाची जबाबदारी घेतल्यावर, नक्षलवाद मूळापासून नष्ट करण्यासाठी वचनबद्ध असलेल्या शहा यांनी : संवाद, सुरक्षा आणि समन्वय या तीन स्तंभांवर काम केले. २०१४ पूर्वी सरकारच्या प्रतिसादाचे नेतृत्व नक्षलवाद्यांच्या हातात होते, तर २०१४ नंतर, हे नेतृत्व गृहमंत्रालयाच्या हाती आले. आता, सरकारने आपला विखुरलेला दृष्टिकोन सोडून एकत्रित आणि ठाम दृष्टिकोन स्वीकारला. जे शस्त्रे सोडून मुख्य प्रवाहात प्रवाहात यायला तयार आहेत त्यांचे स्वागत केले गेले, परंतु निरपराध आदिवासींना मारण्याचा निर्धार करणाऱ्यांविरुद्ध सुरक्षा दलांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले होते. नक्षलवाद्यांचा निधी, कायदेशीर मदत आणि शहरी नेटवर्क तोडण्यात शहा यांची निर्णायक रणनीती दिसून आली.

नक्षलवाद्यांचा निधी, कायदेशीर मदत आणि शहरी नेटवर्क तोडण्यात शहा यांची ठोस रणनीती दिसून आली. ईडी आणि एनआयएने त्यांच्या आर्थिक पुरवठ्याला पूर्णतः आळा घातला. त्याचे परिणामही स्पष्ट दिसले: २००४ -१४ च्या तुलनेत २०१४ - २०२४ मध्ये सुरक्षादलांच्या मृत्यूंमध्ये ७३% आणि नागरिकांच्या मृत्यूंमध्ये ७४% घट झाली. ही केवळ आकडेवारी नाही तर अंत्योदय राजकारणाचे प्रणेते शाह यांनी राबवलेल्या नवीन धोरणाचे यश आहे.

विशेषतः छत्तीसगडने २०२४ नंतर निर्णायक यश मिळवले. भाजप सरकार सत्तेत आल्यानंतर फक्त एका वर्षात २९० नक्षलवादी मारले गेले, १०९० जणांना अटक करण्यात आली आणि ८८१ जणांनी आत्मसमर्पण केले. २०२५ मध्येच २७० नक्षलवादी ठार झाले, ६८० जणांना अटक करण्यात आली आणि १२२५ जणांनी शरणागती पत्करली. असे परिणाम याआधी कधीही पाहिले गेले नव्हते.

'ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट' हे याचे सर्वात उल्लेखनीय उदाहरण ठरले. तेलंगणा-छत्तीसगड सीमेवर नक्षलवाद्यांचा मोठा कॅम्प ज्यामध्ये दोन वर्षांचा रेशन, आयईडी फॅक्ट्या आणि घातक शस्त्रे होती २३ मे २०२५ रोजी पूर्णपणे उद्ध्वस्त केला गेला. यात २७ कट्टर नक्षलवादी मारले गेले. त्यानंतर बीजापूरमध्ये आणखी २४ नक्षलवादी मारले गेले. २०२४ मध्येच ९८ उच्चस्तरीय नक्षलवादी कमांडरांचा खात्मा करण्यात आला.

आज परिस्थिती अशी आहे की २०१४ मध्ये १२६ जिल्हे नक्षलग्रस्त होते, जे आता फक्त १८ वर आले आहेत. सर्वाधिक प्रभावित जिल्हे ३६ वरून फक्त ६ वर आले आहेत. यावरून स्पष्ट होते की सुरक्षित भारताचे शिल्पकार शाह यांनी नक्षलवादाची मुळे हादरवून टाकली आहे.

जिथे एकेकाळी नक्षलवाद्यांनी रस्ते बांधकाम थांबवले होते आणि कंत्राटदारांना मारले होते, तिथे आता विकासाची गाडी वेगाने धावत आहेत. आदिवासींना शिक्षण, आरोग्यसेवा आणि रोजगार मिळण्यामागील खरे कारण गरिबी नव्हते, तर सशस्त्र डाव्या विचारसरणीचे होते. शाह यांच्या कठोर धोरणांमुळे हा खोटा प्रचार उघड झाला आहे. शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेल्यांना आदिवासींची चिंता नाही, तर जगभरात नाकारलेल्या डाव्या विचारसरणीला जिवंत ठेवण्याची चिंता आहे आणि आणि ही वस्तुस्थिती आता सगळ्यांना समजली आहे.आता देश २०२६ पर्यंत नक्षलवादमुक्त भारताकडे वाटचाल करत आहे. त्यामुळे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही की मोदीजींच्या दृष्टिकोन आणि शाह यांच्या रणनीतीने एकत्रितपणे इतिहास घडवला आहे. येणाऱ्या पिढ्या या काळाला लक्षात ठेवतील की काँग्रेसच्या धोरणांमुळे वाढलेल्या लाल दहशतवादाला एका दृढनिश्चयी नेतृत्वाने शेवटचा श्वास मोजायला भाग पाडले.




# ठाण्यात प्रतिधि शिष्यवृत्ती लाभार्थ्यांचा सत्कार

ठाणे दि.३ (प्रतिनिधी)- ठाण्यात आयोजित कार्यक्रमात आमदार संजय केळकर यांनी अमेझॉनच्या प्रतिधि शिष्यवृत्ती कार्यक्रमात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला. यावेळी अमेझॉन इंडियाच्या ऑपरेशन्स (पश्चिम) संचालक गीता उप्पल उपस्थित होत्या. या उपक्रमाअंतर्गत देशभरातील ५,००० मुलांपर्यंत शिक्षणाची मदत पोहोचली आहे, ज्यात दिव्यांग मुलांचा समावेशही आहे. शालेय शिक्षणात पुढे जाण्यासाठी आर्थिक सहाय्य आणि मार्गदर्शन मिळत असून, आतापर्यंत ७ शहरांतील ७,८०० मुलांना हा उपक्रम लाभ झाला आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पूरग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन

बारामती दि.३ (प्रतिनिधी)- राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार हे २६ ते २८ सप्टेंबर या तीन दिवसीय बारामती दौऱ्यावर असताना राज्यातील पूरग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन त्यांनी केले असता विविध संस्था, नागरिकांकडून सामाजिक बांधिलकी जपत अवघ्या तीन दिवसात २७ लाख ५२ हजार ३०० रुपयांची मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये मदत केली, याबद्दल उपमुख्यमंत्र्यांनी त्यांचे आभार मानले.

बारामती तालुक्यातील श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना १५ लाख रुपये, नवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था, करंजे २ लाख ५० हजार, अक्षय शिंदे फाऊंडेशन २ लाख, बारामती तालुका सहकारी खरेदी विक्री संघ १ एक लाख, बारामती कृषी उत्पन्न बाजार समिती १ एक लाख, शंकर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था १ एक लाख, संदीप जगताप आणि भारत गावडे यांनी प्रत्येकी १ एक लाख, बारामती सराफ असोसिएशन ७५ हजार, पंकज निलाखे यांनी ५१ हजार, श्रीपाल नागरी पतसंस्था ५१ हजार, बारामती तालुका मराठा सेवा संघ २५ हजार, नितीन आटोळे २५ हजार रुपये, बारामती तालुका सहकारी पतसंस्था फ ेडरेशन २१ हजार, अजयश्री बिगर ग्रामीण सहकारी पतसंस्था, मुरुम २१ हजार रुपये, बारामती तालुका आजी माजी सैनिक संघटना ११ हजार, छत्रपती शिवाजी महाराज विकास सोसायटी १० हजार, सुनील राजेभोसले १० हजार रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहायता निधीसाठी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्याकडे सुपूर्द केला.

करंजेपुल येथे राजनंदिनी आणि राजवीर मालेगावकर यांनी आम्हाला नाही तर आमच्या शेतकरी बांधवांना खाऊची गरज असल्याची भावना व्यक्त करत आपल्या खाऊचे जमा केलेले २ हजार ३०० रुपये रोख रक्कम पुरग्रस्तांना मदत म्हणून दिली. त्याबद्दल उपमुख्यमंत्री श्री.




पवार यांनी त्यांचे विशेष अभिनंदन करुन कौतुक केले.

राज्यात विविध जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले असून या संकटकाळात राज्य शासनाच्यावतीने नागरिकांना धीर देत त्यांचे जीवनमान पूर्वपदावर आण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात येत आहे. पूरग्रस्तांना मदत करण्याकरिता विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, सामाजिक संस्था पुढे येऊन सढळ हाताने मदत करीत आहे, संकटाच्याकाळात एकमेकांना मदत करणे ही आपल्या राज्याची परंपरा व संस्कृती आहे. आगामी काळातही पूरग्रस्तांना अधिकाधिक मदत करावी, असे आवाहन श्री. पवार यांनी केले.

# औद्योगिक विकासामुळे समृद्ध अर्थव्यवस्था निर्माण होणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

चंद्रपूर दि.३ (प्रतिनिधी)- चंद्रपूर जिल्ह्यात खनिज विकास निधीतून अनेक मोठे उपक्रम राबविण्यात येत आहे. यात टाटा ट्रस्टच्या माध्यमातून कॅन्सर हॉस्पिटल, कौशल्यावर आधारित रोजगार, आरोग्य, पायाभूत सुविधांचा विकास, शिक्षण आणि नाविन्यपूर्ण उपक्रमाचा समावेश आहे. विशेष म्हणजे चंद्रपूर आणि गडचिरोलीमध्ये इंडस्ट्रियल मॅग्नेट तयार होत असून औद्योगिक विकासामुळेच समृद्ध अर्थव्यवस्था निर्माण होणार आहे, असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.




मुल (जि. चंद्रपूर) येथील विश्रामगृहात, जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्यावतीने तयार करण्यात आलेल्या कॉफी टेबल बुकचे अनावरण करताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके, आमदार सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे यांच्यासह जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे, जिल्हा खनिकर्म अधिकारी रोहन ठवरे व इतर अधिकारी उपस्थित होते.

ज्या ठिकाणी उत्खनन होते, तेथील नागरिकांना खनिज निधीचा फायदा झाला पाहिजे, अशी संकल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आहे, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, खनिज उत्खनन आणि वाहतुकीमुळे जो त्रास स्थानिकांना होतो. त्यामुळे खनिज निधीचा सर्वात जास्त वाटा स्थानिक लोकांनाच मिळाला पाहिजे.

चंद्रपूर जिल्ह्याने खनिज क्षेत्रात अनेक चांगले उपक्रम हाती घेतले आहेत. विशेष म्हणजे खनिज विकास निधीमधून रोजगार निर्मिती, आरोग्य, विकास, शिक्षण, कौशल्य आधारित नाविन्यपूर्ण प्रकल्प चंद्रपूर जिल्ह्यात अतिशय चांगल्या पद्धतीने राबविण्यात येत आहे.

चंद्रपूर आणि गडचिरोली हा परिसर इंडस्ट्रियल मॅग्नेट म्हणून तयार होत आहे. त्यामुळे दीड लक्ष लोकांना रोजगार मिळणार आहे. पर्यावरणाचे संतुलन राखून हा विकास आपल्याला करायचा आहे.

औद्योगिकरणासोबतच चंद्रपूरने पर्यावरण संतुलन राखले, असा संदेश गेला पाहिजे. कौशल्य विकास आणि रोजगारावर भर देऊन १०० टक्के स्थानिकांना रोजगार मिळेल, अशी व्यवस्था आपण उभी करणार आहोत. गतकाळात आपण ५० कोटी वृक्ष लागवड मोहीम यशस्वीरीत्या राबवली. यावेळी सुद्धा चंद्रपूरने वृक्ष लागवडीचे मोठे उद्दिष्ट गाठावे. संपूर्ण भारतात केवळ महाराष्ट्र राज्याने ग्रीन कव्हर वाढवले असून आपला परिसर नैसर्गिक समृद्ध आहे. मात्र आता आपल्याला संपूर्ण महाराष्ट्राचे वनक्षेत्र ३३ टक्क्यांच्या वर नेण्याकरिता करिता विशेष लक्ष द्यायचे आहे. चंद्रपूर जिल्हा प्रशासनाने खनिज विकास निधीतून अतिशय चांगले काम केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे यांनी तर आभार जिल्हाधिकारी विनय गौडा

# कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकांचे मानधन दिवाळीपूर्वी अदा करावे-राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

मुंबई दि.३ (प्रतिनिधी)- केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा आणि मानव विकास कार्यक्रमांतर्गत कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना राज्यात राबविण्यात येत आहे. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकांचे मानधन नियोजन विभागामार्फत अदा करण्यात येते.

हे मानधन दिवाळीपूर्वी अदा करण्यात यावे, असे आदेश शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ पंकज भोयर यांनी दिले. तसेच, राज्य शासनाच्या कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजनेंतर्गत असलेल्या शाळा आदर्श करण्याचेही त्यांनी सूचित केले.

कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजनेंतर्गत कार्यरत शिक्षकांच्या प्रश्नांबाबत मंत्रालयात शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीला आमदार मनीषा कायंदे, समग्र शिक्षण राज्य प्रकल्पाचे संचालक संजय यादव, शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन, उपसंचालक राजेश कंकाळ, नियोजन विभागाचे उपसचिव मनीषा राणे उपस्थित होते.

राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले, केंद्राच्या समग्र शिक्षा अंतर्गत असलेल्या विद्यालयातील शिक्षक आणि राज्य शासनाच्या योजनेतील विद्यालयातील शिक्षकांचे मानधन समान करण्यात यावे. यातील तफावत दूर करावी. यासाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा. समग्र शिक्षा व मानव विकास कार्यक्रमांतर्गत कार्यरत कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयांवर एकछत्री प्रशासकीय नियंत्रण असावे. राज्याच्या योजनेतील विद्यालयांचे समग्र शिक्षामध्ये समावेशन करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करावा.

या दोन्ही योजनांमध्ये निवासी शाळा असल्यामुळे विद्यार्थिनींच्या भोजन, निवासाच्या सुविधा दर्जेदार असाव्यात.

या निवासी विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, असेही राज्यमंत्री भोयर यांनी यावेळी सांगितले.

पान १ वरुन

### उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांच्या...

दोघांमधील संभाषण आहे. त्यांनी त्या ठशांचा उपयोग कशासाठी केला? हे सांगावे. हे महाराष्ट्रातील जनतेला समजले पाहिजे. हे वास्तव आहे. या लोकांची औकात आहे का माझ्यावर बोलण्याची. हिंमत असेल तर उद्धव ठाकरेंनी डायरेक्ट बोलावे. आमच्या दोघांचीही नार्को टेस्ट करा. ते दोन दिवस कुणालाही मातोश्रीमध्ये वर पाठवत नव्हते. कुणालाही एन्ट्री नव्हती.

ते पुढे म्हणाले, शिवसेनाप्रमुखांसारखे माणसे आजारी पडतात तेव्हा डॉक्टर स्वतःहून डेथ झाल्याचे सांगतात. पण त्यांनी मला त्याची घोषणा करण्यास सांगितले. मी लोकांना सामोरा गेलो. मी मर्द माणूस आहे. मी घाबरणारा नाही. मी एवढी वर्षे बोललो नाही. पण काल भाषणात ओघाने बोलून गेलो. उद्धव ठाकरे ज्या पद्धतीने स्टेटमेंट देत आहेत, ते तसे नाहीत. हे लोकांना समजले पाहिजे. ते वाघ नाहीत. लांडगे आहेत. अनेक गोष्टी आहेत. मी जेव्हा तोंड उघडेल तेव्हा मातोश्रीला हादरा बसेल. माझ्या नादाला लागू नका. मी शिवसेनाप्रमुखांना दिवस काढलेत. हजारो वेळा त्यांनी माझी पाठ थोपटली आहे. त्या बाळासाहेबांसोबत असे दोन दिवस घडले असेल, तर ते अतिशय वाईट व गंभीर गोष्ट आहे.

पत्रकारांनी याविषयी बाळासाहेबांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांना विचारावे. ते ही त्यांचे डेथ दोन दिवसांपूर्वीच झाल्याचे सांगतील. मी माझ्या मतावर ठाम आहे. मी बदलणार नाही. मला प्रसिद्धीची लालसा नाही. बाळासाहेबांसारख्या माणसांसोबत असे घडत असेल तर ती अतिशय वाईट गोष्ट आहे.

रामदास कदम म्हणाले, शरद पवारही तेव्हा आले होते. पण त्यांनाही वर पाठवण्यात आले नाही. त्यावर शरद पवार, अरे उद्धव त्यांच्या बॉडीला का त्रास देतो, असे म्हणाले होते. मी तेव्हा मातोश्रीतच होतो. उद्धव ठाकरे यांच्याकडून हे पाप झाले. माझ्याकडे अनेक गोष्टी आहेत. मी बोलणार नाही. पण वेळ आली तर सोडणारही नाही. बाळासाहेब तुमच्याविषयी माझ्याकडे खूप काही बोलले होते. मला ते बोलायला लावू नका. मी हे जे काही बोलत आहे ते चूक नव्हे तर वास्तव आहे. हे घडले आहे, असे रामदास कदम यावेळी उद्धव ठाकरे यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करताना म्हणाले.

### मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र...

यावे असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

आमच्या गॅझेटिअर असताना तुम्ही मराठा आरक्षणाला चॅलेंज करतात तर आम्ही सुद्धा चॅलेंज करणार आहोत. प्रत्येक मराठा बांधवांनी कलेक्टरला निवेदन द्यावे की, १९९४ चा जी आर रद्द करावा, आणि ५० टक्क्याच्या वर गेलेले २ टक्के आरक्षण रद्द करावे. १४ टक्के आरक्षणानंतर ज्या बोगस जाती आरक्षणात घातल्या आहेत त्यांचे आरक्षण रद्द करावे. ज्या प्रगत जाती आहेत त्या बाहेर काढाव्यात. ज्या समान जाती नाहीत त्यांचे आरक्षण रद्द करावे, असे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांकडे दिले पाहिजे. महाराष्ट्रातील सर्व मराठा बांधवांनी कुणबी प्रमाणपत्र काढून घेतले पाहिजे, असेही जरांगे यांनी म्हटले आहे.

५८ लाख नोंदी निघाल्या आहेत, त्यांची यादी प्रत्येक ग्रामपंचायतमध्ये लावावी, अशी आमची मागणी विखे पाटील आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आहे. तर यासोबतच गुन्हे माघे घेण्याचे राहिले आहेत ते गुन्हे तातडीने रद्द करा. सरकारकडे तिसरी मागणी आहे की ज्यांचे मराठा आरक्षणाच्या लढाईत बलिदान दिले गेले त्यांच्या कुटुंबीयांना निधी द्या. तुम्ही घोळ घालू नका, त्यांना नोकऱ्या द्या सर्व गॅझेट घेऊन पटकन काम सुरू करा. शिंदे समितीला नोंदी शोधण्याचे काम पुन्हा सुरू करावे. तहसीलदारांना कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज भरुण घेण्यासाठी सांगा या कामांना वेळ लावू नका, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

### मुंबई मराठी माणसांपासून..

उद्धव ठाकरेंनी हे पद दिले होते. उद्धव ठाकरेंनी या सर्वांना मोठ्या मनाने पदे दिली. मंत्रिपदे दिली आणि हे आता उद्धव ठाकरेंवर टीका करत आहेत. तुमच्या सारखा एक रिक्षावाला आज ५ लाख कोटी रुपयांचा मालक झाला, एका वेळेला १०० कोटी निवडणुकीवर उधळतात हे सर्व उद्धव ठाकरेंमुळेच झाले, याचे आत्मचिंतन शिंदेंनी केले पाहिजे. बाळासाहेब ठाकरे यांनी मला नेते पद दिले मला राजकारण काय हे सगळे माहिती आहे, असा टोला संजय राऊत यांनी रामदास कदम यांना लगावला आहे.

### लहान मुलांसाठी कफ सिरपच्या..

सुनिश्चित होईल. या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी सर्व दवाखाने, जिल्हा आरोग्य विभाग, औषध वितरण केंद्रे, प्राथमिक आणि सामुदायिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये तसेच वैद्यकीय शिक्षण संस्थांमध्ये तातडीने करावी, असे निर्देश सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना देण्यात आले आहेत.

### सोनम वांगचुक यांच्या पत्नीची....

कशी आहे, ते कुठे आहेत किंवा अटकेची कारणे काय, याची माहिती देण्यात आलेली नाही. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, लडाखचे नायब राज्यपाल आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही पत्रे लिहून सोनम यांच्या सुटकेची मागणी केली आहे, असे गीतांजली यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. दसऱ्याच्या सुट्टीमुळे सर्वोच्च न्यायालयाचे कामकाज सोमवारी ६ ऑक्टोबरला सुरू होईल, त्यादिवशी हॅबिअस कॉर्पस याचिकेवर सुनावणी होण्याची शक्यता आहे.